follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३२६ सातारा सोमवार दि.२६ ऑगस्ट २०२४ पाने ४ किंमत ५/- रूपये

# केंद्राप्रमाणे राज्यातही लागू होणार नवीन पेन्शन योजना



**मुंबई :** राज्यातील शासकीय कर्चमाऱ्यांसाठीही आता नवीन पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे.

केंद्र सरकारने काल मोठा निर्णय घेत सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवीन पेन्शन योजना लागू केली होती. तशाच प्रकारची योजना

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय!

आता राज्यातील शासकीय कर्चमाऱ्यांनाही लागू करण्यात आली आहे. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय इतर काही महत्त्वाचे निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले आहेत.

शनिवारी केंद्रातील मोदी सरकारने सरकारी कर्मचाऱ्यासाठी नवीन यूनिफाइड पेन्शन योजना जाहीर केली होती. या योजनेंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वर्षातील वेतनाच्या किमान ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार असल्याचे सरकारद्वारे म्हटलं होतं. तसेच जर पेन्शनधारकाचे निधन झाले, तर त्याच्या कुटुंबाला मृत्युवेळी मिळणाऱ्या पेन्शनच्या ६० टक्के रक्कम दिली जाईल, असेही सरकारकडून सांगण्यात आलं होतं. याशिवाय नोकरदाराने १० वर्षांच्या सेवेनंतर नोकरी सोडली, तर त्याला १० हजार रुपये पेन्शन मिळेल, अशी माहितीही केंद्र सरकारकडून देण्यात आली होती.

हीच योजना आता राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनासुद्धा लागू करण्यात आली आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२४ पासून या योजनेची अंमलबावणी करण्यात येणार आहे. राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार असल्याचे राज्य सरकारकडून सांगण्यात आलं आहे.

मंत्रिमंळाच्या बैठकीतील इतर महत्त्वाचे निर्णय

आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत इतरही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील जास्तीत-जास्त शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज देणाचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यासाठी संबंधित योजनांची व्याप्ती वाढवली जाणार आहे. तसेच गटप्रवर्तकांच्या मानधनात ४ हजारांची भरीव वाढ करण्याचा निर्णयसुद्धा राज्य सरकारने घेतला आहे. याशिवाय स्व. पै.खाशाबा जाधव कुस्ती संकुलाच्या कामाला गती देणे, पर्यायी खडकवासला फुरसुंगी बोगदा निर्माण करणे, नार-पार-गिरणा नदी जोड प्रकल्पासाठी ७ हजार १५ कोटी रुपयांची मान्यता, सहकारी साखर कारखान्यांना शासन हमीवरील कर्ज परतफेडीसाठी संपूर्ण संचालक मंडळावर जबाबदारी, ३० ऑगस्टपर्यंत शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या, ज्येष्ठ नागरिकांसाठी महामंडळ, ठाणे येथील महत्वाकांक्षी क्लस्टर योजनेसाठी महाप्रित ५ हजार कोटी निधी, 'बार्टी' च्या ७६३ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा लाभ आणि मुंबई महानगरात रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना झपाट्याने पूर्ण करण्याचा निर्णयसुद्धा आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

याशिवाय कळंबोली येथील पशुवैद्यकीय रुग्णालयासाठी भाडेपट्टा, सेवाशुल्क माफ करणे, चिपळूण, रामटेक, इचलकरंजी येथील जमिनीच्या आरक्षणात फेरबदल करणे, श्रीमंत उदयनराजे भोसले यांच्या सरंजाम जमिनींना देण्यात आलेली सूट वंशपरंपरेने त्यांच्या वारसांना देणे आणि पाचोऱ्यातील सहकारी सूत गिरणीस अर्थसहाय्य देण्याचा निर्णयही आज राज्य सरकारने घेतला आहे.

# मुंबई पुणे महामार्गावर एसटी बस आणि मोटारीचा जोरदार अपघात



**सासवड :** मुंबई-पुणे रस्त्यावर खडकी रेल्वे स्थानक परिसरात भरधाव एसटी बसने मोटारीला धडक दिल्याची घटना रविवारी घडली. अपघातात मोटारीतील भूमी अभिलेख विभागातील अधिकारी महिलेचा मृत्यू झाला. अपघातात महिलेचा पती आणि मोटार चालक भाऊ, तसेच दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातात एसटी बसमधील १२ प्रवासी किरकोळ जखमी झाले.

मनिषा विजयसिंह भोसले (वय ४०, रा. कवठे महंकाळा, जि. सांगली) असे मृत्युमुखी पडलेल्या अधिकारी महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी एसटी बसचालक अनंत पंजाबराव उईके (वय ३३, रा.नारायणगाव) याला ताब्यात घेतले असून, खडकी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनीषा भोसले आणि त्यांचे पती शासकीय अधिकारी आहेत. मनिषा भोसले यांची नुकतीच पुरंदर तालुक्यात बदली झाली होती. त्या पिंपरीतील चिखली भागात राहणाऱ्या भावाकडे आल्या होत्या. दरम्यान पुरंदरला बदली झाल्याने भोसले यांनी हडपसर भागात भाडेतत्वावर घर घेतले आहे. रविवारी सकाळी मोटारीतून भोसले, त्यांचे पती आणि भाऊ हडपसरकडे निघाले होते. एसटी बस शिवाजीनगर स्थानकातून नारायणगावकडे निघाली होती.

खडकी रेल्वे स्थानक परिसरात समोरून येणाऱ्या भरधाव एसटी बसने मोटारीला धडक दिली. अपघातात मोटारीच्या दर्शनी भागाचे मोठे नुकसान झाले. अपघातनंतर एसटी बसचालकाचे नियंत्रण सुटले. एसटी बसने एका मोटारीला आणि दुचाकी स्वाराला धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला. अपघातानंतर रहिवासी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मोटारीत अडकलेल्या तिघांना बाहेर काढून तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले.दरम्यान भोसले यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले परंतु उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या अपघातात भोसले यांचे पती आणि मोटारचालक भाऊ जखमी झाला असून, त्यांच्यावर ससूनमधील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अपघातात एसटी बस मधील १२ प्रवाशांना दुखापत झाली.

पुरंदरचे भूमी अभिलेख अधिकारी विकास गोफणे यांनी नुकतीच बदली झाली असून मनिषा भोसले यांची नियुक्ती झाली होती. नियुक्ती नंतर त्यांनी कामकाजाला सुरुवात करून तीन ते चार बैठकाही घेतल्या होत्या. त्यामुळे पुरंदर मधील प्रलंबित

## मासेमारी करणारी बोट समुद्रात अडकली

**ठाणे :** भाईंदर पश्चिमेच्या उत्तन पातानबंदर येथील मासेमारी करणारी गॉडविल नावाची बोट समुद्रातून घरच्या दिशेनं निघाली असताना अचानक पंखा तुटल्यानं बोट समुद्रात अडकली. यावेळी या बोटीत एक नाखवा सह १७ खलाशी होते. कोणत्याही प्रकारचा संपर्क होत नसल्यानं वायरलेसद्वारे मच्छिमार संस्थांच्या कार्यालयाला माहिती देण्यात आली.

त्यानंतर मच्छीमार संघटनेचे बर्नड डिमोलो यांनी कोस्टगार्ड, पोलीस तसंच मत्स्य विभागाला सदर बोटीची माहिती दिली. मात्र, भर पावसात वादळात अडकलेल्या बोटीला कोणत्याही प्रकारे प्रशासनाची मदत मिळाली नाही, अशी माहिती बर्नड डिमोलो यांनी दिली.



# देशातील पहिली विजेवर चालणारी एलिवेटेड बस उपराजधानीत; केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची माहिती

**नागपूर :** नागपुरात देशातील पहिली विजेवर चालणारी एलिवेटेड बस सेवा सुरू होईल, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. नागपुरातील रिंग रोडवर पन्नास किलोमीटर अंतरापर्यंत ही खास बस सेवा चालवली जाईल. त्यासाठी टाटा आणि स्कोडा या नामांकित ऑटोमोबाईल कंपन्यांच्या संयुक्त उपक्रमातून ही खास बस तयार केली जात असून ती बस १८ मीटर लांब राहणार आहे. या खास बसमध्ये प्रवाशांना विमानासारख्या सर्व सोयी उपलब्ध राहील, असे ही गडकरी म्हणाले.

विशेष म्हणजे एसटी किंवा महापालिकेकडून डिझेलवर चालवल्या जाणाऱ्या बस सेवेपेक्षा विजेवर चालणाऱ्या या बस सेवेचे दर ३० टक्क्यांनी कमी राहतील. असा दावा ही गडकरींनी केला आहे. एलिव्हेटेड मार्गावर विजेवर चालणाऱ्या बस सेवेचा हा देशातील पहिलाच प्रयोग राहील आणि त्याची अंमलबजावणी नागपुरातील अत्यंत वर्दळीच्या रिंग रोडवर ५० किलोमीटर अंतरापर्यत केली जाईल अशी माहिती ही नितीन गडकरींनी दिली. आज नागपुरात नैसर्गिक शेती या पुस्तकाचे विमोचन गडकरी यांच्या हस्ते होत असून ऍग्रो व्हिजन शेतकरी भावनाचे भूमिपूजनही पार पडला. यावेळी या कार्यक्रमात ते बोलत होते.

कधीकाळी माझ्या पाठीमागे माझ्या वक्तव्याची खिल्ली उडवायचे

देशाचा शेतकरी एक दिवस इंधन उत्पादन करेल, विमानांना उडवण्यासाठी लागणारे एअर फ्युल तयार करेल, असं मी गेल्या पंधरा वर्षापासून बोलत होतो. शेती क्षेत्रात माझ्यासोबत काम करणारे माझे सहकारी ही साहेब काहीही बोलतात, असे बोलायचे. माझ्या पाठीमागे माझ्या वक्तव्याची खिल्ली उडवायचे, माझ्यासमोर बोलण्याची त्यांची हिंमत नव्हती, मात्र आज मला आनंद आहे की आपल्या देशातील शेतकरी इंधन उत्पादनामध्ये बायो फ्युलच्या माध्यमातून आपला वाटा देत आहेत.

देशात इथेनॉल वर आधारित पेट्रोल पंप सुरू होत आहे. देशातील सर्व मोठ्या ऑटोमोबाईल कंपन्यांना मी इथेनॉल चालणारे वाहन उत्पादन करण्यास लावले आहे. शेतकरी खाद्य पिकांच्या उत्पादन करून श्रीमंत होऊ शकत नाही. तर शेतकऱ्यांनी बायोफ्यूल तयार करणाऱ्या पिकांच्या माध्यमातून इंधन उत्पादनात वाटा द्यावा, त्याच्यातून ते श्रीमंत होऊ शकतात. असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बोलताना व्यक्त केलाय.

बुलढाणा, अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये दहा हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आजवर आत्महत्या केली आहे. आमचे प्रयत्न आहे की हे आत्महत्या थांबल्या पाहिजे. या भागात कापूस, सोयाबीन आणि संत्रा प्रमुख शेती उत्पादन आहे. या पिकांचे मूल्यवर्धन कसं होईल, याचे प्रयत्न सुरू आहे. कोणत्याही परिस्थिती एका एकरात १५ क्विंटल कापूस आणि १५ क्विंटल सोयाबीनचे उत्पादन झालेच पाहिजे. असेही नितीन गडकरी

# लाडकी बहीण योजनेबाबत देवेंद्र फडणवीसांचे विधान चर्चेत

**मुंबई :** राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. १ जुलैपासून ही योजना सुरू झाली असून सव्वालाख पात्र महिलांच्या खात्यात प्रत्येकी तीन लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. तसंच, ऑगस्ट महिन्यात अर्ज करणाऱ्या महिलांचीही संख्या वाढत जातेय. त्यामुळे ऑगस्टमध्ये अर्ज करणाऱ्या महिलांसाठी महत्त्वाची बातमी आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. ते यवतमाळ येथे आयोजित केलेल्या महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' मेळाव्यात बोलत होते.

''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत दरमहिना १५०० रुपये दिले जात आहेत. ही योजना घोषित केली तेव्हा विरोधकांनी विधानसभेत खूप टीका केली. कोणी म्हणाले ही फसवी योजना आहे, कोणी म्हणाले १० टक्के महिलांनाही या योजनेचा लाभ मिळणार नाही, कोणी म्हणाले की महिलांना लाच देता का, महिलांना विकत घेता का, बहिणींनो या नादान लोकांना बहिणीचे प्रेम काय असते हे माहिती नाही. प्रत्यक्ष ईश्वर जरी उतरला तरी प्रेम विकत घेता येत नाही. हे अनमोल प्रेम आहे. आमच्या बहिणींचे प्रेम अनमोल आहे'', असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

''आपल्या बहिणींचं इतकं निखळ प्रेम मिळतं तर त्यांच्या पाठीशी उभं राहता येईल असं काहीतरी करायला पाहिजे. तुम्ही म्हणता ना की १० टक्के लोकांनाही फायदा मिळणार नाही आणि आता दीड कोटी बहिणींना याचा पैसा जातोय. तीन हजार रुपये सव्वाकोटी खात्यात गेले आहेत. उर्वरित खात्यातही पैसे जायला सुरुवात झाली आहे.

# राज ठाकरेंच्या कार्यक्रमात परत गोंधळ, शेगावमध्ये मनसे कार्यकर्त्यांचा राडा

**बुलडाणा :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे सध्या विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत, पण बुलडाण्यामधल्या राज ठाकरेंच्या कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला आहे. शेगावमधल्या या कार्यक्रमात कार्यकर्ते गोंधळ घालत असल्याचं पाहून राज ठाकरे संतापले. तसंच प्रमुख कार्यकर्ते सोडून सर्व कार्यकर्त्यांनी बाहेर जा, फक्त प्रमुख पदाधिकारी हजर राहा, असे आदेश नाराज झालेल्या राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना दिले.

कार्यकर्त्यांना बाहेर काढलं म्हणून मनसेच्या काही कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. राज साहेबांची सभा आहे म्हणून स्थानिक पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्ते आणले होते. शेगावच्या



देशमुख मंगल कार्यालयात राज ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यानंतर राज ठाकरे आणि अमित ठाकरे निघाले.

याआधी चंद्रपूरमधल्या राज ठाकरेंच्या कार्यक्रमातही कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला होता. राज ठाकरे यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील २ विधानसभा क्षेत्रातील उमेदवारी घोषित केल्या. उमेदवारी घोषित केल्यानंतर संधी न मिळाल्याने नाराज झालेल्या कार्यकर्त्यांनी राज ठाकरे बैठकीच्या बाहेर पडताच सभेच्या ठिकाणी गोंधळ घालत खुर्च्यांची तोडफोड केली.

राजुरा विधानसभा मतदारसंघात सचिन भोयर याच्या उमेदवारीला विरोध करत भोयर समर्थक आणि दुसरे इच्छुक चंद्रप्रकाश बोरकर समर्थकांमध्ये हाणामारी झाली. बैठकीत गोंधळ घालणाऱ्या प्रकाश बोरकर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. राज ठाकरे यांनी पक्षात बेशिस्त खपवून घेतली जाणार नाही, त्यांच्यावर कडक कारवाईचा इशारा दिला आहे.

# गोदावरी नदीला दुसऱ्यांदा पूर

## गोदाकाठची मंदिरं पाण्याखाली


**नाशिक :** नाशिकमध्ये गेल्या दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळं गोदावरी नदीला यंदाच्या पावसाळ्यात दुसऱ्यांदा पूर आलाय. गंगापूर धरणातून ८ हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग केल्यानं गोदावरी नदीच्या पाण्याची पातळी वाढली आहे. जिल्ह्यातील बहुतांश धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू असल्यानं धरणातून विसर्ग सुरू आहे. गोदावरी नदीच्या पाण्याची पातळी वाढल्यानं रामकुंड परिसरातील अनेक लहान, मोठी मंदिरं पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळं प्रशासनाच्या वतीनं गोदाकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय.



नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणासह दारणा, पालखेड, नांदूर मधमेश्वर धरणांतून देखील मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. दारणा धरणातून १४ हजार क्यूसेक वेगानं पाण्याचा विसर्ग सुरू असल्यानं गोदावरी नदीच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झालीय. गोदावरी काठी असलेल्या मारुतीच्या मस्तकापर्यंत पाणी पोहोचलंय. तर नांदूर मधमेश्वर धरणातून ३९ हजार क्यूसेस पाण्याचा विसर्ग गोदावरी नदीत सुरू असल्यानं जायकवाडी धरण देखील भरत आहे.

नाशिकला ऑरेंज अलर्ट : कुलाबा वेधशाळेकडून नाशिकसाठी २७ ऑगस्टपर्यंत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलाय. मात्र, रविवारी (२५ ऑगस्ट) वातावरणात बदल होऊ शकतो. त्यामुळं अलर्ट देखील बदलला जाऊ शकतो, असंही सांगण्यात आलंय.

आपत्कालीन परिस्थितीसाठी दूरध्वनी क्रमांक जारी : शनिवार (२४ ऑगस्ट) सायंकाळपासून पावसाचा जोर वाढल्यामुळं, तसंच गंगापूर धरणातून होणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळं नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सुरक्षित स्थळी स्थलांतरित व्हावं, असं आवाहन नाशिक महानगरपालिकेच्या वतीनं करण्यात आलंय. पूर बघण्यासाठी नागरिकांनी नदी किनारी गर्दी करू नये, कुठलाही धोका पत्करू नये. तसंच आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास ०२५३२५७१८७२ किंवा ९६०७००९१०१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असंही नाशिक महानगरपालिकेच्या वतीनं सांगण्यात आलंय.



**संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत राजपथ दिसतोय सुना सुना ..**

**गेली तीन दिवस संततधार पावसाने सातारा शहर परिसरातील सामान्य नागरिकांचे जनजीवनच विस्कळीत केले आहे .त्यातच रविवारी असलेली साप्ताहिक सुट्टी आणि पडणारा जोराचा सकाळपासूनचा पाऊस यामुळे सातारा शहरातील प्रमुख वरदळीचा समजला जाणारा राजपथही असा सुना सुना दिसत होता या रस्त्यावर वाहतूक मंदावली होती. तर अनेक नागरिकांनी घरातून बाहेर न पडणे पसंत केले अगदी कामासाठी छत्री रेनकोट घेऊन बाहेर पडलेल्या नागरिकांना मात्र जोराच्या पावसाच्या सरींचा मारा खावा लागत होता. (छाया : अतुल देशपांडे, सातारा)**

# मोदी यांच्या युक्रेन भेटीचा संदेश

**गेल्या अडीच वर्षांपासून रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू असून युद्धाच्या झळा काय केवळ त्या दोन देशांपुरत्याच मर्यादित आहेत असे नाही. जग त्यात होरपळते आहे. भारताने या युद्धाबद्दल थेट रशियाचा निषेध केला नसला, तरी युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा मार्ग नाही. संवादाचे दरवाजे खुले ठेवणे हाच मार्ग असल्याचे भारताने वारंवार स्पष्ट केले आहे. रशिया हा भारताचा जसा मित्र आहे, तसाच युक्रेन व्यापारीदृष्ट्या भारतासाठी महत्त्वाचा देश आहे. त्यामुळे दोन्ही देशांशी भारताला चांगले संबंध ठेवायचे आहेत. त्यामुळे तर तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचा दौरा केला. त्यानंतर आता त्यांनी युक्रेनला भेट दिली.**

सोव्हिएत महासंघातून १९९२ मध्ये बाहेर पडल्यानंतर युक्रेन हा स्वतंत्र देश झाला. युक्रेन हे स्वतंत्र राष्ट्र झाल्यानंतर त्याला भेट देणारे मोदी हे पहिलेच भारतीय पंतप्रधान आहेत. साहजिकच पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्याकडून सर्वांना मोठ्या अपेक्षा होत्या. तेथे रवाना होण्यापूर्वी खुद्द मोदी खूप उत्साहात होते. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांना भेटण्यास उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले होते. झेलेन्स्की यांनी त्यांचे अतिशय प्रेमाने स्वागत केले आणि तेथील युद्ध परिस्थितीची माहिती दिली. दोन्ही नेत्यांमधील चर्चेत प्रामुख्याने युद्ध थांबवण्याचे मार्ग शोधण्यावर भर होता. वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गानेच युद्धातून मार्ग निघू शकतो, असा कानमंत्र पुन्हा मोदी यांनी झेलेन्स्की यांना दिला आहे. दोन्ही देशांनी चार करारांवर स्वाक्षऱ्याही केल्या. या करारांमुळे कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आणि मानवतावादी सहाय्य या क्षेत्रात सहकार्य सुनिश्चित होईल. पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्यावर जगाचे लक्ष होते. कारण रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध केवळ भारतच थांबवू शकतो, हे सुरुवातीपासूनच अधोरेखित केले जात होते; मात्र भारत सुरुवातीपासूनच दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांना युद्धाचा मार्ग सोडण्याचे आवाहन करत आहे. युक्रेनला रवाना होण्यापूर्वीच पंतप्रधान म्हणाले होते, की ही युद्धाची वेळ नाही. युद्ध कोणतीही समस्या सोडवू शकत नाही. युक्रेनपूर्वी पंतप्रधान रशियालाही गेले होते. तेव्हा झेलेन्स्की यांनी नाराजी व्यक्त केली होती. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमिर पुतीन हे जगातील सर्वात मोठे गुन्हेगार असल्याचे सांगून मोदी यांनी त्यांना मिठी मारल्याबद्दल त्यांनी टीका केली होती;पण आता ते भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी उत्सुक दिसत होते.

पंतप्रधानांचा युक्रेन दौरा अशा वेळी झाला, जेव्हा युक्रेनने रशियन प्रदेशांवर हल्ले तीव्र केले आहेत. हे पाहता पंतप्रधानांच्या आवाहनाचा युक्रेन किंवा रशियावर कितपत परिणाम होईल हे सांगणे कठीण आहे. यापूर्वी अनेक प्रसंगी मोदी यांनी पुतीन यांना फोनवर किंवा समोरासमोर बोलून युक्रेनवरील हल्ले थांबवण्याचे आवाहन केले आहे. नुकत्याच झालेल्या रशियाच्या दौऱ्यातही मोदी यांनी पुतीन यांना असेच आवाहन केले होते; पण आजपर्यंत असा एकही प्रसंग दिसला नाही, जेव्हा रशियाने भारताच्या आवाहनावर गांभीर्य दाखवले असेल. शांघाय शिखर परिषदेदरम्यान समोरासमोर चर्चेनंतर पुतीन यांनी भारतीय पंतप्रधानांचे आवाहन गांभीर्याने घेतल्याचे दिसत होते; मात्र तेथून परतताच त्यांनी युक्रेनवरील हल्ले अधिक तीव्र केले. रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम संपूर्ण जगावर झाला आहे. युक्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक मारले गेले आहेत, त्यांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. युक्रेनचा व्यापार विस्कळीत झाला आहे. त्याला युद्धबंदीचा करार हवा आहे, पण तो रशियाच्या अटी मान्य करायला तयार नाही. युक्रेनने 'नाटो'चे सदस्यत्व सोडावे, अशी रशियाची अट आहे. दोघांपैकी कोणीही कोणत्याही प्रकारे झुकायला तयार दिसत नाही. अशा स्थितीत आपण वाटाघाटीच्या टेबलावर कसे बसू शकतो, हा सर्वात कठीण प्रश्न आहे. भारतालाही त्यांच्यासाठी संवादाचा मार्ग शोधणे सोपे नाही; पण पंतप्रधानांनी दोन्ही देशांचे एक एक करून केलेले दौरे आणि युद्धाचा मार्ग सोडण्याचे त्यांनी केलेले आवाहन यामुळे जागतिक बंधुतेचा मार्ग मोकळा झाला आहे. रशिया आणि युक्रेन काहीसा लवचिक दृष्टिकोन स्वीकारतील आणि करारासाठी मध्यम मार्ग अवलंबण्यास सहमत होतील अशी अपेक्षा आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्या खांद्यावर हात ठेवून पंतप्रधान मोदींनी एक-दोन नव्हे तर तीन महत्त्वाचे पावले उचलली आहेत. मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी 'अर्थपूर्ण चर्चा' केली आणि रशियासोबत सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठी वैयक्तिकरित्या योगदान देण्याचे आश्वासन दिले. मोदी यांनी 'एक्स'वर लिहिले, की युक्रेन भेट ऐतिहासिक होती. भारत-युक्रेन मैत्री आणखी घट्ट करण्याच्या उद्देशाने मी या महान देशात आलो आहे. माझे झेलेन्स्की यांच्याशी फलदायी संभाषण झाले. शांतता कायम राहिली पाहिजे, यावर भारताचा ठाम विश्वास आहे. आदल्या दिवशी, मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी व्यापक चर्चा केली. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाने युक्रेनवर हल्ला केला. तेव्हापासून आजतागायत दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरूच आहे. मोदी आणि झेलेन्स्की यांनी युक्रेनमधील शांतता आणि सुरक्षेबाबतही चर्चा केली. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान भारत 'तटस्थ किंवा उदासीन प्रेक्षक' नव्हता आणि नेहमीच शांततेच्या बाजूने होता, असे मोदी म्हणाले.

दोन्ही देशांच्या प्रमुख नेत्यांची भेट जगासाठी मोठा संदेश आहे. मोदी आणि झेलेन्स्की यांच्यातील द्विपक्षीय बैठकीमुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील. जागतिक मंचावर आणि उर्वरित जगाशी रशियाशी संवादाची शक्यता वाढविण्याचा प्रयत्न करेल. रशियासोबतच्या युद्धावर शांततापूर्ण वाटाघाटीतून तोडगा काढण्याच्या दिशेने दोन्ही देश वाटचाल करतील. मोदी यांच्या युक्रेन आणि पोलंड दौऱ्यानंतर अमेरिकेसह पाश्चात्य देशांना खात्री पटली आहे, की भारत युक्रेनसोबत एकत्र पुढे जात आहे. म्हणजे भारताचा कल ना रशियाकडे आहे ना पाश्चात्य देशांकडे. जागतिक राजकीय पटलावर भारत तोच मार्ग स्वीकारेल, जो भारत आणि जगासाठी चांगला असेल हे सर्व देशांना कळून चुकले आहे. तीन आघाड्यांवर भारताची नजर आहे.

पहिली गोष्ट म्हणजे युरोपच्या शांतता उपक्रमात भारताचा समावेश करणे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे युक्रेनवरील रशियन आक्रमणामुळे निर्माण झालेल्या जागतिक भू-राजकीय गोंधळात भारताचा सहभाग वाढवणे आणि तिसरा मुद्दा म्हणजे सोव्हिएत काळापासून थंडावलेले युक्रेनसोबतचे भारताचे राजनैतिक संबंध पुनरुज्जीवित करणे. युक्रेनमधील युद्ध संपवण्याच्या प्रश्नावर पंतप्रधान मोदी यांच्याकडे कोणतीही भव्य योजना नाही, असे पूर्वी दिसत होते. युद्ध आणि शांतता या विषयावर झेलेन्स्की यांच्याशी दीर्घ आणि सखोल चर्चे साठी मोदी यांचा वॉर्सा ते युक्रेन ते कीव असा लांब रेल्वे प्रवास हा एक महत्त्वाचा टप्पा मानला गेला. कीव्हला दुसरी शांतता योजना हवी होती. मोदी यांनी युक्रेनच्या चिंता समजून घेतल्या. ज्या राष्ट्र म्हणून त्याच्या अस्तित्वासाठी महत्त्वाच्या होत्या. युक्रेनला या मुद्द्यावर भारत आणि तथाकथित जागतिक अधिकाराकडून पाठिंबा मिळत नव्हता.

झेलेन्स्की यांना आशा आहे, की युक्रेनचे प्रकरण ऐकण्यासाठी आणि शांतता प्रयत्नांना हातभार लावण्याची मोदी यांची इच्छा त्यांच्याबद्दल सकारात्मक दृष्टीकोन आणेल. कारण युद्धाचे प्रचंड आर्थिक परिणाम असूनही दक्षिणेतील मोठा भाग अलिप्त राहिला आहे. दुसरीकडे, युक्रेनमधील युद्धाचे भू-राजकीय परिणाम समोर येत असताना, मोदी यांची कीव भेट हे जगाला नव्याने आकार देणाऱ्या संघर्षात भारत यापुढे मूक प्रेक्षक म्हणून राहणार नाही, याचे द्योतक आहे. मोदी यांचा युक्रेन दौरा यावेळच्या प्रमुख युरोपीय आणि जागतिक युद्धांना सक्रियपणे आकार देण्याचा भारताचा निर्धार अधोरेखित करतो. मोदी वॉर्सा ते कीव असा प्रवास करत असताना, चीनचे पंतप्रधान ली कियांग मॉस्कोला भेट देत होते. युक्रेनमधील युद्धाची रूपरेषा तयार करण्यात चीनच्या वाढत्या भूमिकेची ही आठवण आहे. भारत आपल्या हिताला महत्त्व देत आहे. अमेरिकेत युरोपपासून दूर जाण्याच्या रिपब्लिकन कल्पनेला आता डेमोक्रॅट्सकडून आव्हान दिले जात आहे. त्या चर्चेच्या निकालाचा भारताच्या सुरक्षा धोरणावर मोठा परिणाम होईल. या आठवड्यात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या वॉशिंग्टनमधील उपस्थितीने अमेरिकेशी भारताचे वाढणारे धोरणात्मक संबंध अधोरेखित केले, तर राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि झेलेन्स्की यांच्याशी मोदी यांच्या जलद भेटींनी त्यांच्या हितसंबंधांवर प्रकाश टाकला आहे . भारत आणि युक्रेनमधील संबंध मजबूत करणे याशिवाय, भारत आणि युक्रेनमधील द्विपक्षीय संबंध पुनर्संचयित करण्याच्या दृष्टीनेही मोदी यांचा युक्रेन दौरा महत्त्वाचा होता. सोव्हिएत काळात, भारताला युक्रेनमध्ये प्रवेश मिळण्याचा विशेषाधिकार होता; परंतु कीवला स्वातंत्र्यानंतर भारतासोबतच्या संबंधांमध्ये कोणतीही उबदारता लाभली नाही. युक्रेनमध्ये भारताप्रती असलेली विलक्षण सद्भावना मोदी यांच्या कीवमध्ये झालेल्या हार्दिक स्वागतातून दिसून आली. मोदी आणि झेलेन्स्की यांनी त्यांच्या संबंधांना धोरणात्मक भागीदारीमध्ये रूपांतरित करण्याची, त्यांच्या आर्थिक आणि संरक्षण संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची आणि त्यांच्या सांस्कृतिक संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची वचनबद्धता युक्रेन आणि भारत दोघांसाठीही महत्त्वाची आहे. - भागा वरखडे

## शरद पवारांनी सांगितले पंढरपूरला गुपचूप जायचे कारण



**मुंबई** : राष्ट्रवादी आध्यात्मिक आणि वारकरी आघाडीच्या वारकरी संमेलनाचा समारोप सोहळा शरद पवारांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. या कार्यक्रमात बोलताना शरद पवारांनी आपण पांडुरंगाचं दर्शन घ्यायला गाजावाजा करत जात नाही, असं सांगितलं. ८ महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी आध्यात्मिक व वारकरी आघाडीची स्थापना करण्यात आली होती. स्थापनेनंतरचं पहिलंच अधिवेशन पुण्यात आयोजित करण्यात आलं.

काय म्हणाले शरद पवार?

'मी पांडुरंगाचं दर्शन घ्यायला जातो, पण मी कधी गाजावाजा करत नाही. त्यांचं दर्शन करायला जातो, हे काय जगाला सांगायची गरज नाही. प्रसिद्धीपेक्षा दर्शन समाधानकारक असतं', असं शरद पवार म्हणाले आहेत. मला पोलिसांनी इथे येण्याच्या आधी विचारलं की तुम्ही जाणार आहात का? मी म्हणलं जाणार आहे. काही लोकांना मी जाणार म्हणून अस्वस्थता जाणवली पण हे जे लोक आहेत ते पांडुरंगाचे खरे भक्त आहेत का? असा सवालही शरद पवारांनी विचारला.

'वारीमध्ये जाऊन पांडुरंगाच्या दर्शनासाठी जाणारा खरा वारकरी आहे. पांडुरंगाच्या नावाने व्यवसाय करणाऱ्या घटकांना मी पांडुरंगाचा भक्त मानत नाही', असं वक्तव्यही शरद पवारांनी केलं आहे.

'मी आज भाषण करायला नाही तर ऐकायला आलो आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आपण कार्यक्रम केला नाही पाहिजे. एक समाज तयार व्हायला पाहिजे आणि तो समाज पुरोगामी पाहिजे, ही एक महत्त्वाची गरज आहे. ज्यांच्याकडून समाजात भूमिका घेण्याची अपेक्षा आहे ते जात, धर्म बघून भूमिका घेतात', असं शरद पवार म्हणाले.

'वारकरी संप्रदायाचा प्रचार, प्रसार करताना आपल्याला ज्ञानेश्वर माऊली आणि तुकारामांसोबतच नामदेव महाराजांनापण विसरून चालणार नाही. तुकाराम महाराजांनी नेहमी उपेक्षितांच्या विचारांची भूमिका मांडली. देशात एक सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी नामदेव महाराजांचे महत्त्व आहे.

## फडणवीसांच्या राजीनाम्यावरून पवारांच्या पक्षातच दोन गट?

## सुप्रिया सुळेंची मागणी जयंत पाटलांनी फेटाळली

**पुणे :** राज्यात गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे. बदलापूर येथे दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचारानंतर विरोधकांकडून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. लेकींना न्याय देता येत नसेल तर राजीनामा द्या, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. अशात पुण्यात आता थेट पोलिसांवरच गुन्हेगारांनी कोयत्याने हल्ला केल्याची घटना घडली. यावरुन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी बोलताना त्यांनी फडणवीस यांच्या राजीनाम्यावरही टिपण्णी केली.

पुणे कोयता गँगने पोलिसांवर हल्ला केल्याने खळबळ उडाली. याविषयी बोलताना जयंत पाटील म्हणाले, की हा अत्यंत धक्कादायक प्रकार आहे. आजपर्यंत पोलिसांवर हात उगारण्याची छाती कोणाची होत नव्हती. आज अड्ड वरच कोयता गँग हल्ला करायला लागली. त्यात ते जखमी झालेले आहे. कायदा व सुव्यवस्था राहिल्याचे दिसत नाही. पोलिसांचा वचक राहिलेला नाही. गृहखात्याचा भोंगळ कारभार आहे. अशा घटनांमुळे पोलीस अधिकाऱ्यांचे मनोबल खचले आहे. गुन्हेगारच प्रबळ होत असल्याचे चित्र आहे. याचा आज पुण्यात अनुभव आला. याचा निषेध करतो तो. महाराष्ट्र पोलीस दलामागे सरकारने ठाम उभा राहिला पाहिजे. महाराष्ट्र सरकारने भूमिका घेतली पाहिजे. सरकारचं राज्याच्या प्रशासनाकडे आणि पोलीस खात्याकडे लक्ष नाही. पुण्यातील पोलीस व्यवस्था किती दुबळी झाली आहे हे दिसून येत आहे, अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी दिली.

थोड्यासाठी राजीनामा नको : जयंत पाटील

दरम्यान, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्यावर बोलताना जयंत पाटील म्हणाले, की आता २ महिने राहिले आहेत. दोन महिन्यांसाठी त्यांचा राजीनामा मागण्यात अर्थ नाही, असे मला वाटते. मुख्यमंत्र्यांपासून सगळेच सरकार महाराष्ट्रात फेल गेलेले आहे. महिलांचे संरक्षण ते करू शकत नाही. आता पोलिसांचे संरक्षण करू शकत नाही, अशी समस्या निर्माण झाली. कोणाची कधी बदली होईल आणि सगळ्याच बदल्या आर्थिक व्यवहार करून होत असेलत तर किती नैतिकता राहिल? असा प्रश्न पाटील यांनी उपस्थित केला.

## महिलांवरील अत्याचारावर पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला संताप

## ''नव्या कायद्यात फाशीच्या शिक्षेची तरतूद''

**जळगाव** : जळगावमध्ये 'लखपती दीदी' कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला अत्याचारावर पहिल्यांदाच भाष्य केलं. ''महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी आम्ही राज्य सरकारसोबत आहोत,'' असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी बोलताना म्हणाले.

महिलांचं संरक्षण केलं पाहिजे : पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ''महिलांवरील अत्याचार हे अक्षम्य पाप आहे. अशा प्रकरणांमध्ये जो कोणी दोषी असेल, त्याला शिक्षा झाली पाहिजे. दोषीला मदत करणारे देखील शिक्षेपासून वाचवता कामा नये. रुग्णालय असो, शाळा असो, कार्यालय असो किंवा पोलीस यंत्रणा, कोणत्याही स्तरावर कारवाई करताना बेजबाबदारपणा दाखवणाऱ्या, गांभीर्य न बाळगता कारवाईकडं दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी. सरकारं येतील जातील, पण एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचं रक्षण व्हायला हवं. महिलांचं चारित्र्य जपलं पाहिजे. एक समाज म्हणून, सरकार म्हणून आपण महिलांचं संरक्षण केलं पाहिजे. ते आपलं मोठं कर्तव्य आहे.''

अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देणार : ''महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यासाठी सरकार कडक कायदा करत आहेत. आधी तक्रार येत होती, वेळेत एफआयआर होत नाही, सुनावणी होत नाही. या अडचणी भारतीय न्याय संहितेतून दूर केल्या आहेत. पीडित महिलांना पोलीस ठाण्यात जायचं नसेल, तर त्या घरुनच ई एफआयआर करू शकतात.

ई एफआयआरमध्ये कोणी छेडछाड करणार नाही, याचीही व्यवस्था केली आहे. त्यामुळे चौकशी चांगली होईल आणि दोषींवर शिक्षा करण्यास मदत होईल. नवीन कायद्यात अल्पवयीन मुलींवरील लैंगिक शोषणावर फाशी आणि जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद केली आहे. महिलांवरील अत्याचार थांबवण्यासाठी आम्ही राज्य सरकारसोबत आहोत. महिलांवर अत्याचार करणारा वाचला नाही पाहिजे,'' असं पंतप्रधान मोदींनी म्हटले.

'लखपती दिदी'मुळे कुटुंबाचा कायापालट : ''या मैदानातील प्रत्येक बहीण, मुलीला चांगलं माहीत आहे की, जेव्हा त्या कमावतात, तेव्हा त्यांचा अधिकार वाढतो. घरात त्यांचा सन्मान वाढतो. जेव्हा महिलांची कमाई वाढते, तेव्हा घरातील लोकांना खर्चासाठी पैसा मिळतो. लखपती दिदी मुळे कुटुंबाचा कायापालट होत आहे'', असं पंतप्रधान मोदींनी सांगितलं. ''आज तिन्ही सैन्य दलात महिला अधिकारी आहेत. फायटर, पायलट महिला बनत आहेत. नारिशक्ती नवा कायदा बनवला. राजकारणात महिलांची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न केले. लखपती दीदींमुळे गावांची अर्थव्यवस्था बदलणार आहे,'' असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी बोलताना म्हणाले.



## आर्थिक लाभ न मिळालेल्या लाडक्या बहिणींची सरकार विरुद्ध नाराजी

**रमेश जाधव/ पुणे**

आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महायुती सरकारने राज्यात मोठा गाजावाजा करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू करून या योजनेच्या माध्यमातून महिलांना महिना पंधराशे रुपये आर्थिक मदत देण्यात आली. आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महिलांचे सरसकट मतदान मिळवण्याच्या हेतूने ही योजना लागू करण्यात आली असून रक्षा बंधनापूर्वी अनेक महिलांच्या खात्यावर दोन महिन्याचे एकूण तीन हजार रुपये पाठविण्यात आले.ह्या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिक मदत असा असला तरी त्यामागे मतपेटीचाच विचार केल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनेची पूर्ण तयारी न करताच घोषणा केल्याचे दिसून येते. कारण घोषणेनंतरच त्यावर अंमलबजावणी सुरू करण्यात आली.

यासाठी अडीच लाख रुपये वार्षिक उत्पन्न व ६० वर्ष वयापर्यंत सर्व महिला पात्र असल्याचा निकष ठरवला असतानाही सरसकट महिलांनी फॉर्म भरले,ज्या महिला या निकषात बसल्या त्यांना पैसे तर आलेच परंतु ज्या महिला या योजनेत बसत नाहीत त्यांच्याही खात्यावर केवळ फॉर्म भरल्यामुळे पैसे आल्याची अनेक उदाहरणे आहेत. परंतु खऱ्या अर्थाने लाभार्थी असलेल्या महिला कागदपत्रा अभावी ,आधार कार्ड, बँक पासबुक किंवा इतर काही तांत्रिक अडचणीमुळे लाभार्थी असूनही त्यांना या

**(वार्तापत्र)**

आर्थिक योजनेचा लाभ मिळाला नाही. अशा महिलांची संख्या फार मोठ्या प्रमाणात असून अशा महिला मात्र शिंदे सरकारवर नाराज झाल्याचे हे चित्र मोठ्या प्रमाणात शहरी आणि ग्रामीण भागात दिसून येते.तर रस्त्यावर राहून मोलमजुरी आणि बिगारी काम करणाऱ्या अनेक महिला आहेत ज्याच्यांकडे आवश्यक कागदपत्राचा अभाव आहे.आधार कार्ड किंवा बँकेत खाते नसणे, आधार कार्ड ला फोन नंबर लिंक नसणे या कारणामुळे सदरचा महिलावर्ग खऱ्या अर्थाने गरजवंत लाभार्थी असूनही या योजनेपासून बाहेर फेकला गेला आहे. त्यामुळे ही योजना गरिबांसाठी आर्थिक मदत म्हणून आणली गेली की फक्त मतदान डोळ्यासमोर ठेवून आणली गेली हा खरा संशोधनाचा विषय आहे.

असे असले तरी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच अधिकृतपणे पैशाचे वाटप करण्या करिता घाईघाईत ही योजना आणली काय ? असा प्रश्न निर्माण होत आहे. या माध्यमातून पैसा महिलांच्या खात्यावर जमा करण्यात येत असल्याचे दिसून येते मात्र याची प्रभावीपणे अंमलबजावणी न झाल्याने बहुतांश महिला लाभार्थी किंवा पात्र असूनही या योजनेपासून वंचित राहिल्या आहेत.केवळ मतदान डोळ्यासमोर ठेवून घाईघाईने ही योजना लागू केल्याने याची अंमलबजावणी प्रभावीपणे राबवली गेली नाही.

शिवाय आगामी निवडणुकीत आमच्याकडे लक्ष द्या आम्ही ही रक्कम दुप्पट करू असेही आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी नुकतेच जाहीरपणे दिले आहे. त्यामुळे शिंदे सरकारकडून ही योजना मतपेटी डोळ्यासमोर ठेवून लागू केली असली तरी त्याचा कितपत फायदा येत्या निवडणुकीत महायुती सरकारला होईल हे स्पष्ट होईलच.

एकीकडे लाडक्या बहिणीसाठी ही योजना आणली असली तरी दुसरीकडे बदलापूर येथील दोन अल्पवयीन मुलींवर शाळेतील कर्मचाऱ्यांनी केलेल्या लैंगिक अत्याचाराने महिलांमध्ये सरकार विरुद्ध मोठ्या प्रमाणात नाराजी किंवा रोष दिसत आहे. सरकारला या रोषालाही सामोरे जावे लागणार असून या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रभर उस्फूर्तपणे अनेक जन आंदोलने,मोर्चे निघाले असून आम्हाला पैसे नकोत पण आमची मुलेबाळे सुरक्षित हवीत असा सूर देखील उमटत आहे.याचाही सरकारला जाब द्यावा लागणार आहे. अशाप्रकारे नाराज झालेला महिला वर्ग मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सरकारला या योजनेचा नक्की कितपत फायदा होतो तो येणारा काळच ठरवेल.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सातारच्या बदामी विहिरी जवळचा पूल कधी होणार पूर्ण ?

**सातारा :** सातारा शहरातील अनंत इंग्लिश स्कूल मार्गे शुक्रवार पेठेतून बदामी विहिरीच्या परिसरातून शाहूपुरी गेंडामाळकडे जाणाऱ्या रस्त्यावर सध्या गेली दीड वर्षे रस्ता फोडून तेथे ओढ्यावर नवीन भव्य दिव्य असा पुल उभारणीचे काम सुरू आहे.

मात्र सध्या या पुलाचे काम अतिशय रेंगाळलेल्या स्वरूपात असल्यामुळे केवळ दोन ते तीन मजुरांच्या सहाय्याने हे काम अतिशय संथ अशा कासवगतीने सुरू असल्यामुळे या परिसरातून ये जा करणाऱ्या सर्वच नागरिकांना प्रचंड हाल आणि त्रास सहन करावा लागत आहे.

या परिसरातून येजा करणाऱ्या दररोज शाळकरी तसेच चाकरमानी नोकरदार आणि व्यावसायिक लोकांसाठी हा पूल खरोखर ऐतिहासिक असा स्वरूपाचा भरभक्कम होता मात्र येथून वाढत असलेली वर्दळ आणि वाहतूक लक्षात घेऊन हे बांधकाम सुरू केले गेले मागील वर्षी मात्र त्या बांधकामाला अतिशय संत गतीने सुरुवात झाल्यामुळे आता या परिसरातून यजा करणाऱ्या नागरिकांना अक्षरशः जीवाचे हाल करून दुसरा रस्ता शोधून ये-जा करावी लागत आहे. त्यातच शुक्रवार पेठेतील जोशी हॉस्पिटल मार्गे कोटेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद रस्त्यावर हा रस्ता वाहतुकीसाठी वापरला जात असल्यामुळे प्रचंड वर्दळ होत आहे तसेच या छोट्या रस्त्यावरून येणे जाणे ही नागरिकांना पर्यायी मार्गच असल्यामुळे त्यात आणखीन त्रासाची भर पडत आहे त्यामुळे हे बांधकाम त्वरेने पूर्ण करावे अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

# साताऱ्यात जन्माष्टमीची धामधूम, मंदिरे सजली विद्युत रोषणाईने

**सातारा :** सालाबादप्रमाणे श्रावण महिन्यातील कृष्ण अष्टमी अर्थात श्रीकृष्ण जन्माष्टमी याही वर्षी सलग तीन दिवस संततधार पावसात सातारा जिल्ह्यातील नागरिक मोठ्या उत्साहाने व विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी करत आहेत.

सोमवारी संपन्न होणाऱ्या श्रीकृष्ण जन्माष्टमीचा जन्मोत्सव रात्री बारा वाजता साजरा होणार असून मंगळवारी दहीहंडी अर्थात दहीकालाने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

सातारा शहरातील यादोगोपाळ पेठेतील श्री दिवशीकर बंधू यांच्या श्री मुरलीधर मंदिरात रविवारी दुपारी शंकराचार्य मठातील ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत मंत्र जागर करण्यात आला .श्री मुरलीधर मंदिरावर केलेली आकर्षक विद्युत रोषणाई तसेच फुलांच्या पुष्पगुच्छ यांची



सजावट विशेष लक्षवेधक ठरत आहे.

या मंदिरात असलेल्या सुमारे दीडशे होऊन वर्षापूर्वीच्या ऐतिहासिक झुंबरे ही विशेष लक्षवेधक असून याच मंदिराच्या छताला लावण्यात आलेली श्रीकृष्ण तसेच यशोदा आणि राधा कृष्णाची विविध रंगीत पोस्टर्स कृष्ण भक्तांचे लक्ष वेधून घेणारी आहेत.मुरलीधर मंदिरात सलग तीन दिवस संपूर्ण देशातील मान्यवर गायकांच्या कृष्ण धून तसेच कृष्ण भजने आणि कृष्णभक्ती गीतांनी एक वेगळाच माहोल तयार झाला होता. सुप्रसिद्ध पंडित भीमसेन जोशी, पंडित अनूप जलोटा, पंडित जसराजजी, पंडित जगजित सिंग यांच्या अतिशय सुरेल गायकीने नटलेली ही भजने आणि कृष्ण धून ऐकताना अक्षरशा मन भारावून जात होते.

वेदमूर्ती गोविंद शास्त्री जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या मंत्रजागर कार्यक्रमात ११ ब्रह्मवृंदांनी सहभाग घेतला होता .त्यानंतर सायंकाळी साडेसहा ते आठ या वेळेत श्रीरामकृष्ण सेवा मंडळाचे भक्तांनी श्रीमनाम संकीर्तन व श्रीकृष्ण भगवान यांची विविध भजने व भक्ती गीते सादर केली. सोमवारी सकाळी वेदमूर्ती माधवशास्त्री भिडे गुरुजी यांच्या उपस्थितीत हवामान पंचसूक्त तसेच श्रीकृष्ण मूर्तीस महाअभिषेक करण्यात येणार आहे.

त्यानंतर सायंकाळी विविध भजनांचा कार्यक्रम आणि रात्री बारा वाजता पूजा तसेच विष्णुसहस्त्रनाम संपन्न होऊन रात्री बारा वाजता जन्म काळाची महती व कथन करून जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे. मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजता काल्याचे किर्तन होऊन या जन्माष्टमी कार्यक्रमाची सांगता होणार आहे. दरम्यान सातारा शहरातील खणआळीतील श्रीकृष्ण मंदिर, संत नामदेव मंदिर तसेच कोंडवे अहमदाबाद येथील श्री इस्कॉन मंदिर करंजे पेठेतील श्री महानुभाव पंथाच्या श्रीकृष्ण मंदिरातही विशेष विद्युत रोषणाई तसेच महापूजा अभिषेक याचे आयोजन करण्यात आले आहे. कृष्णानगर परिसरातील श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिरातील श्री राधाकृष्ण मूर्ती चा विशेष जन्मोत्सव सोहळा संपन्न होणार आहे. सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांचे समाधी मंदिराच्या वरील बाजूस असणाऱ्या गोपाल कृष्ण मंदिरातही जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच फलटण तालुक्यातील गिरवी येथील श्री. देशपांडे यांच्या श्रीकृष्ण मंदिरातही जन्मोत्सवानिमित्त विष्णुसहस्त्रनाम पठण तसेच भजन आणि विशेष महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे.

# सहकारी उपसा जलसिंचन योजनांमध्ये सभासदांचे सहकार्य आवश्यक : आ. पाटील

**कराड :** सहकारी तत्त्वावरील उपसा जलसिंचन योजनांमुळे परिसरामध्ये हरितक्रांती होऊन सर्वसामान्य सभासद शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे, त्यांचे आर्थिक परिवर्तन घडले आहे. या योजना टिकल्या पाहिजेत, योजना अडचणीत आल्यास सर्वसामान्य शेतकरी अडचणीत येईल. त्यासाठी सर्व सभासदांच्या सहकार्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन आमदार बाळासाहेब पाटील यांनी वसंतगड येथील श्री चंद्रसेन सहकारी पाणीपुरवठा संस्थेच्या वार्षिक सभेत केले.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन श्री शांताराम खाशाबा कदम हे होते.

यावेळी सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामचंद्र पाटील व माणिकराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

दरम्यान संस्थेचे सचिव श्री गणेश जामदार यांनी सभेची नोटीस वाचन केले, संस्थेचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, ऑडिटर नेमणूक आदी विषयांचे तपशीलवार वाचन होऊन सर्व विषय मंजूर करण्यात आले.



**वसंतगड :** उपसा जलसिंचन योजनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना आ. बाळासाहेब पाटील समवेत संस्थेचे चेअरमन, व्हॉईस चेअरमन, संचालक मंडळ व सभासद.

पाणीपट्टी विषयाबाबत साधक बाधक विचारविनिमय झाला. सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची खुलासेवार उत्तरे सचिव जामदार व संचालक निकम यांनी सभेत दिली.

आ. बाळासाहेब पाटील पुढे म्हणाले की, सहकारी संस्था टिकल्या पाहिजेत, त्याचे अस्तित्व अबाधित राहिले पाहिजे यासाठी सर्व सभासदांनी एकत्र येऊन सहकार्य करावे. उपसा जलसिंचन योजनेच्या सभासदांनी योजनेची पाणीपट्टी भरून योजनेच्या उत्पन्नात भर घालावी. योजनेवर पिकवलेला ऊस सह्याद्री कारखान्याकडे गलितास पाठवावा. खाजगी कारखान्यास ऊस दिल्यामुळे पाणीपट्टी वसुलीस अडचण निर्माण होत आहे, थकीत पाणीपट्टी संस्थेकडे जमा झाली नाही तर संस्थेस दैनंदिन खर्च, वीज बिल, मेंटेनन्स, नोकर पगार आदी अत्यावश्यक खर्च भागवणे कठीण होते व संस्था अडचणीत येते. यासाठी सभासदांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे.

याप्रसंगी संस्थेचे व्हा. चेअरमन अरविंद सुर्यवंशी,विजय सुर्वे, महिपती कोकरे, तानाजी कणसे, शिवाजी सुर्वे, डॉ. सुभाष जामदार, बाजीराव सुर्वे, मारुती सर्वे, पांडुरंग सुर्वे, जगन्नाथ कणसे, रामचंद्र केंजळे, हणमंत निकम, नाथाजी मोहिते, सुहास गायकवाड, बजरंग पाटील, सुनील सुर्वे तसेच अभयनगर, वसंतगड, साकुर्डी येथील संस्थेचे सभासद उपस्थित होते.

# सहकाराबरोबरच आनंदराव चव्हाण पतसंस्थेची सामाजिक बांधिलकी

## वर्धापनदिनानिमित्त संस्थेत विविध कार्यक्रमाचे आयोजन

**ढेबेवाडी :** सभासद, ठेवीदार आणि हितचिंतकांच्या पाठबळावर सहकाराबरोबरच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आनंदराव चव्हाण पतसंस्थेने गेल्या ३० वर्षाच्या कालावधीत ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागात संस्थेचे जाळे निर्माण करुन सहकारात आपला वेगळा आदर्श निर्माण केला असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी दिली.

येथील आनंदराव चव्हाण ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या मंद्रुळकोळे (ढेबेवाडी) ता. पाटण येथील शाखेच्या ३० व्या वर्धापनदिनानिमित्त संस्थेच्या कार्यालयात सत्यनारायण पुजा, स्वागत समारंभ, विविध ठेव योजनेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक हिंदुराव पाटील, व्हा चेअरमन सुभाष बाटे, संचालक सदाशिव



**ढेबेवाडी :** आनंदराव चव्हाण पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त ठेवपावती वितरण करताना हिंदुराव पाटील, अभिजीत पाटील व इतर.

कदम, आर. बी. पाटील, बबनराव सुर्यवंशी, हणमंत कदम, सर्जेराव पाटील, पांडुरंग पुजारी, सुरेश मोहिते, दिनकर साखरे, जितेंद्र कुंभार, शारदा गरुड, वासंती पाटील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले, संस्थेने आपले कार्य आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित न ठेवता अडल्यानडलेल्यांच्या मदतीला धावून जावून त्यांना नेहमीच मदतीचा हात दिला आहे. आज संस्थेच्या सातारा जिल्ह्यात विविध ठिकाणी शाखा कार्यरत आहेत.असे सांगून म्हणाले संस्थेने सुशिक्षित बेरोजगार आणि उद्योजकांना अर्थसाहाय्य करुन स्वतःच्या पायावर उभे करण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे. संस्थेचे संस्थापक हिंदुराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची वाटचाल सुरु असल्याचे म्हणाले. व्यवस्थापक सुहासचंद्र पाटील यानी स्वागत केले तर शाखाप्रमुख रुपेशकुमार भोई यांनी आभार मानले.

# शिक्षण मंडळची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**कराड :** शिक्षण मंडळ, कराड सेवकांच्या सहकारी पतसंस्थेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा महिला महाविद्यालय, कराड येथे खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

सभेच्या अध्यक्षस्थानी गोविंद पवार होते. पतसंस्थेचे उपाध्यक्ष पराग सोनटक्के, संचालक संग्राम माळी, आबाजी मोरे, प्रशांत कसबे, सुनीता यशवंत कोळी, सुनीता प्रकाश कोळी, मेघना भोसले, विजय बोधे, संदीप जोशी, पल्लवी भोसले, रंजेश भालेराव, प्रभा ठोंबरे, सचिव पंडित मोरे व सभासद बहुसंख्येने उपस्थित होते. सभेस उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत व सभेचे प्रास्ताविक अध्यक्ष गोविंद पवार यांनी केले. मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन संचालक आबाजी मोरे यांनी वाचले. आवाजी मतदानाने ते मंजूर करण्यात आले. चालू वर्षाचा ताळेबंद संचालक विजय बोधे यांनी सभेसमोर ठेवला. नफा वाटप ठराव संचालक संदीप जोशी यांनी मांडला. तसेच मासिक वर्गणी वाढवणे, नूतन वर्षात वैधानिक लेखपरिक्षकांची नेमणूक करणे इ विविध ठराव मांडण्यात आले. सभेने सर्व ठराव एकमताने मंजूर केले.



**कराड :** वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना गोविंद पवार

तसेच पुढील वर्षात संस्थेचे सर्व कामकाज संगणकीय केले जाणार आहे या संबंधी माहिती उपाध्यक्ष पराग सोनटक्के यांनी सभेस दिली.आभार संचालक विजय बोधे यांनी मानले तर सूत्रसंचालन मेघना भोसले यांनी मानले.

# कराड दक्षिण स्वारीसाठी सात मराठे इच्छुक

## कराडकर घेणार मनोज जरांगे पाटीलांची भेट; शासकीय विश्रामगृहातील बैठकीत निर्णय

**कराड :** मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावे, सगेसोयर्याबाबत अधिसूचना काढूनही त्याबाबतचा अध्यादेश काढला जात नसल्याने मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्यावतीने विधानसभा निवडणूक लढवण्याचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर कऱ्हाड दक्षिण विधानसभा मतदारसंघात मराठा समाज बांधवांनी विधानसभा निवडणुकीत स्वतंत्रपणे लढण्यासाठी तयारी सुरु केली आहे. येथे झालेल्या बैठकीत सात जणांनी मुलाखती दिल्या आहेत. त्यानुसार संबंधित सातजण मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेणार आहेत.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी बोटचेपी भूमिका घेत आहे. मराठा समाजातील बहुतांश आमदार, खासदार ठोस भूमिका घेत नाहीत. त्याचवेळी सत्ताधारी व विरोधी पक्षातील मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यास विरोध करणारे सर्वपक्षीय आमदार, नेते एकाच व्यासपीठावर आले आहेत. त्यामुळेच मराठा आमदार, खासदार मूग गिळून गप्प का बसले आहेत, असा संतप्त प्रश्न मराठा समाजा बांधवांकडून उपस्थित केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी सत्ताधारी व विरोधकांकडून होणार्या फसवणुकीला कंटाळून विधानसभा निवडणूक लढविण्याचे संकेत दिले आहेत. त्याबाबतचा निर्णय २९ ऑगस्टला होणार होता. मात्र आता हा निर्णय काही काळासाठी पुढे ढकलण्यात आला आहे. यापार्श्वभूमीवर येथे मराठा समाजाची बैठक झाली. त्यात कऱ्हाड दक्षिण विधानसभा मतदारसंघासाठी सात जणांनी इच्छा प्रकट केल्यानंतर त्यांच्या मुलाखती झाल्या. यावेळी कऱ्हाड तालुका सकल मराठा समाज बांधवांची उपस्थिती होती. मुलाखती पार पडल्यानंतर सात इच्छुकांची नावे मराठा क्रांती मोर्चाकडून घोषित करण्यात आली आहेत. यात येथील रणजित पाटील, अॅड. दिपक थोरात, जनार्दन देसाई, रविंद्र यादव, विद्या मोरे, प्रकाश पाटील आणि विजय जगताप या नावांचा समावेश आहे. हे सर्वजण मनोज जरांगे पाटील यांची लवकरच भेट घेत आपली बाजू मांडणार आहेत.

**जरांगे-पाटील काय निर्णय घेणार ?**

- जरांगे-पाटील यांनी निवडणुक लढवण्यासंदर्भात मराठा समाजाला आदेश दिला आहे. त्यानुसार मराठा समाजाच्या दोन-तीन बैठका झाल्या आहेत. पहिल्या बैठकीत नावावर शिक्कामोर्तब झाले नाही. त्यामुळे पुन्हा एकदा बैठक घेण्यात आली. त्यातुन सात नावे अंतीम करण्यात आली आहेत. त्या नावावर जरांगे-पाटील यांच्याशी चर्चा झाल्यानंतर निर्णय घेण्यात येणार आहे.

# पुण्यातील ३५ मंडळांची मंगळवारी संयुक्त दहीहंडी

## पुनीत बालन ग्रुपचा स्तुत्य उपक्रम

**पुणे :** 'पुनीत बालन ग्रुप'च्या माध्यमातून पुण्यातील ३५ नामांकित सार्वजनिक गणेश मंडळे एकत्र येऊन यावर्षी दहीहंडी उत्सव साजरा करणार आहेत. चौकाचौकात होणाऱ्या दहीहंडीमुळे होणारी वाहतूक कोंडी आणि सुरक्षा व्यवस्था यामुळे पोलीस प्रशासनावर मोठा ताण येतो. हा ताण कमी करण्याच्या उद्देशाने श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंडळाने पुढाकार घेतला आहे. मंडळाचे उत्सव प्रमुख, विश्वस्त व युवा उद्योजक पुनीत बालन यांनी मंडळांना एकत्र आणत या संयुक्त दहीहंडीचा निर्णय घेतला आहे. मंगळवारी (२७ ऑगस्ट) रोजी कसबा पेठेतील लाल





महाल चौकात सार्वजनिक गणेश मंडळांचा संयुक्त दहीहंडी कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती पुनीत बालन यांनी दिली.

मागील काही वर्षांपासून 'पुनीत बालन ग्रुप' आणि गुरुजी तालीम मंडळ एकत्र येऊन दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करतात. अल्पावधीतच या उपक्रमाला मोठी लोकप्रियता मिळाली. ठिकठिकाणी होणाऱ्या दहीहंडीच्या कार्यक्रमांमुळे वाहतूक कोंडी आणि प्रदुषणाची समस्या निर्माण होते. पोलीस प्रशासनावरचा ताण वाढतो. या समस्येतून मार्ग काढण्यासाठी पुनित बालन यांनी संयुक्त दहिहंडी कार्यक्रमाची संकल्पना मांडली. त्यांच्या सामाजिक भावनेतून केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत मध्य शहरातील तब्बल ३५ सार्वजनिक मंडळांनी पाठिंबा दिला. सयुंक्त दहीहंडीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे असे बालन म्हणाले.

या उपक्रमात शहरातील श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट, श्री तांबडी जोगेश्वरी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट, श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट, श्रीमंत पेशवे गणपती मंदिर, पुण्येश्वर महादेव मंदिर उत्सव समिती, नवग्रह मित्र मंडळ ट्रस्ट, श्री साने गुरुजी तरुण मंडळ, हुतात्मा भगतसिंग मित्र मंडळ, त्रिमूर्ती मित्र मंडळ (माणिक चौक), जनार्दन पवळे संघ, सुयोग मित्र मंडळ संयुक्त सिद्धीविनायक मित्र मंडळ, क्रांतीवीर राजगुरु मंडळ, श्री हनुमान मंडळ (अग्रवाल तालीम), क्रांतीरत्न चंद्रशेखर आझाद मंडळ.जनता जनार्दन मंडळ, विजय अरुण मंडळ ट्रस्ट, व्यवहार आळी चौक मंडळ, श्री अभिमन्यू मंडळ ट्रस्ट, श्रीकृष्ण मित्र मंडळ, फणी आळी तालीम ट्रस्ट, तरूण शिवगणेश मित्र मंडळ ट्रस्ट, ऑस्कर मित्र मंडळ, प्रकाश मित्र मंडळ, लोखंडे तालीम संघ, त्वष्टा कासार समाज संस्था, भोईराज मित्र मंडळ, थोरले बाजीराव मित्र मंडळ, भरत मित्र मंडळ, प्रभात प्रतिष्ठान, लाल महाल नवरात्रौ उत्सव समिती, श्री कसबा गणपती शिवजयंती उत्सव मंडळ, सूर्योदय प्रतिष्ठान, खराडी, गणेश मित्र मंडळ (अलका चौक), श्री गजानन मंडळ (लक्ष्मी रोड) आणि गुरुदत्त मित्र मंडळ (मंडई) या मंडळाचा समावेश आहे.

# शेतकऱ्यांचं टेन्शन मिटणार, नदीजोड होणार गतीमान

**मुंबई :** महाराष्ट्राच्या विकासासाठी मोदींचं सहकार्य आणि पाठिंबा मिळत राहिल. मोदींच्या नेतृत्वात आता शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं आमचं उद्दीष्ट आहे. मूल्य स्थिरीकरण योजनेंतर्गत बफर स्टॉकसाठी कांदा खरेदीवर मूल्यनितीचा विचार करा. कपाशी आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांवर निश्चित विचार करतील आणि दूधाच्या मुद्द्यावरही नक्कीच विचार करतील. यासह मराठवाडा वॉटर ग्रीड योजना पुढे नेण्यासाठी केंद्र सरकारने मदत करावी. कोकणाच्या बाबतीतही केंद्र सरकारने विचार करावा, अशा काही महत्वाच्या मागण्या राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्या. जळगाव येथे आजोजित लखपती दीदी संमेलनात शिंदे बोलत होते. व्यासपीठावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यपाल राधाकृष्णन, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, खासदार रक्षा खडसे, शिवसेनेचे खासदार प्रतापराव जाधव आदी उपस्थित होते.

शिंदे पुढे म्हणाले, राज्यातील दुष्काळी स्थितीवर मात करण्यासाठी राज्य सरकार नदीजोड प्रकल्पावर भर देत आहे. नीती आयोगाच्या बैठकीत मोदींनीही सांगितलं होतं की राज्य सरकारने नदीजोड प्रकल्पावर काम करावं. त्यानुसार आता मराठवाडा वॉटर ग्रीड योजना पुढे नेण्यासाठी केंद्र सरकारने मदत करावी. कोकणाच्या बाबतीतही केंद्र सरकारने विचार करावा, अशी मागणी एकनाथ शिंदेंनी केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ५० लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचा संकल्प करू या. तुमचा प्रतिसाद चांगला तुमचं मनापासून अभिनंदन करतो. ज्या लखपती झाल्यात त्यांनी इतर महिलांना लखपती दीदी होण्यास मदत करा. राज्य सरकार भक्कमपणे तुमच्या पाठिशी उभे राहिले असे आश्वासन अजित पवार यांनी दिले. यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राज्य सरकारने महिलांसाठी सुरू केलेल्या योजनांचा उल्लेख केला. सरकारने राज्यातील महिलांसाठी अनेक योजना सुरू केल्या. ७५ लाख कुटुंब बचतगटाशी जोडले. आगामी काळात ही संख्या दोन कोटींपर्यंत नेणार आहोत, अशी घोषणा फडणवीस यांनी केली

# महाबळेश्वरात पावसाने केला २०० इंचाचा टप्पा पार



**महाबळेश्वर :** काही दिवसांच्या विश्रांती नंतर महाबळेश्वर येथे पावसाने पुन्हा जोर धरला आहे गेली काही दिवस येथे पावसाची संततधार सुरू आहे आज सकाळी संपलेल्या २४ तासात येथे ८० मी मी तर एकुन ५१२६ मी मी पावसाची नोंद झाली आहे मागील वर्षाच्या तुलनेत यंदा पावसाने २०० इंचाचा टप्पा लवकर पुर्ण केला आहे महाबळेश्वर हे पावसाचे आगार म्हणुन ओळखले जाते उन्हाळी हंगामा प्रमाणेच वर्षा सहलीसाठी येथे पर्यटक मोठ्या संख्येने हजेरी लावतात येथे दरवर्षी साधारण २२५ ते २५० इंच पावसाची नोंद होते तीन वर्षापुर्वी २२ जुलै २०२१ रोजी पावसाने कहर केला होता या दिवशी अतिवृष्टी होवुन अंबेनळी घाटातील रस्ते वाहुन गेले होते पश्चिम भागातील अनेक गावांचा संपर्क तुटला होता ओढे नदीला महापुर आल्याने अनेक गावातील लोकांचे स्थलांतर करावे लागले होते नदी पात्रांनी आपला मार्ग बदलल्याने मोठया प्रमाणावर शेती वाहुन गेली होती अनेक घरांची पडझड झाली दोन महीन्यांपेक्षा अधिक काळ अंबेनळी घाट दुरूस्तीच्या कारणास्तव वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता यंदा मात्र तशी स्थिती ओढवली नाही जुन महीन्यात पावसाने हळुवार पणे सुरूवात केली परंतु पावसाला जोर पकडता आला नाही जुलैच्या प्रारंभीच वेण्णातलाव तुडुंब भरला त्या मुळे महाबळेश्वर व पांचगणी या दोन शहरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकालात निघाला होता पुन्हा उन पावसाच्या खेळा नंतर जुलै अखेरीस पावसाने पुन्हा जोर धरला २० जुलै पासुन तालुक्यात अतिवृष्टी सुरू झाली परंतु सुदैवाने कोणतीही नैसर्गिक आपत्ती ओढवली नाही

ऑगस्टच्या प्रारंभी पावसाचा जोर होता ऑगस्टच्या दोन आठवडयातच पावसाने १९० इंचाचा टप्पा पार केला लवकरच पाउस २०० इंचाचा टप्पा पार करेल अशी अपेक्षा व्यक्त होत असताना व पाउस केव्हा २०० इंचाचा टप्पा पार करणार या कडे तमाम महाबळेश्वरकरांचे लक्ष लागून राहीले असतानाच पावसाने विश्रांती घेतली महाबळेश्वरकरांना रोज सुर्य दर्शन घडु लागले होते चार दिवसां पासुन पावसाचे दबक्या पावलाने महावळेश्वर येथे आगमन झाले आता तर पावसाने जोर धरला आहे त्या मुळे पावसाने महाबळेश्वरात २०० इंचाचा महत्वाचा टप्पा पार केला आहे विकेंडसाठी आलेल्या पर्यटकांना पावसामुळे दिलासा मिळाला असुन पर्यटक हे पावसात चिंब भिजुन मनमुराद पावसाचा आनंद लुटत आहेत केटस् पॉईट वेण्णालेक क्षेत्र महाबळेश्वर मुख्य बाजारपेठ येथे पर्यटकांची गर्दी पहावयास मिळत आहे.

# पोक्सो गुन्ह्यातील नराधमाने जामीनावर सुटल्यावर दिला पीडितेला त्रास

## अल्पवयीन मुलीची आत्महत्या, आरोपीला अटक

**सातारा:** साताऱ्यात पोक्सो गुन्हा दाखल झाल्यानंतर तीन महिने कारागृहात असलेल्या नराधमानं जामीनावर सुटल्यानंतर अल्पवयीन मुलीला वारंवार फोन करुन कुटुंबाला जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. त्याच्या त्रासाला कंटाळून मुलीनं गोंदवले (ता. माण) येथील राहत्या घरी आत्महत्या करत जीवन संपवलं, असा आरोप पीडितेच्या नातेवाईकांनी केला. या घटनेनंतर साताऱ्यात नागरिकांनी रस्त्यावर उतरुन आंदोलन केल्यानं संशयित तस्लिम मोहम्मद खान (रा. सातारा) याच्यावर गुन्हा दाखल करुन त्याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

तरुणाच्या जाचाला कंटाळून संपवलं जीवन : पूर्वी साताऱ्यात राहणारी तरुणी काही दिवसांपूर्वी कुटुंबासह गोंदवले (ता. माण) परिसरात वास्तव्यास गेली होती. साताऱ्यातील तरुण तस्लिम खान हा तिला वारंवार त्रास देत होता. त्याच्यावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. त्या गुन्ह्यात तीन महिने तो कारागृहात होता. जामीन मिळाल्यानंतर पुन्हा त्यानं मुलीला त्रास द्यायला सुरुवात केली. फोन करुन तो मुलीच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देत होता. त्याच्या त्रासाला कंटाळून अल्पवयीन मुलीनं शनिवारी (२४ ऑगस्ट) दुपारी राहत्या घरी आत्महत्या केली.

साताऱ्यातील सामाजिक संघटना आक्रमक : याप्रकरणी मुलीच्या आईनं दहिवडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. तस्लिम खान हा मुलीला फोनवरुन कुटुंबीयांना मारुन टाकण्याची धमकी देत असल्यानं मुलीनं हे पाऊल उचललं आहे. यापूर्वीही तो फोनवरुन वारंवार त्रास देत होता, असं मुलीच्या आईनं तक्रारीत म्हटलंय. या घटनेनंतर सामाजिक संघटना आक्रमक झाल्या. मृत मुलीच्या नातेवाईकांसह नागरिकांनी संशयिताला फासावर लटकवण्याची मागणी करत पोवई नाक्यावर आंदोलन केले.



# वाई महसुलच्या भोंगळ कारभाराने शासनाच्या अटल भूजल योजनेचे लाखोंचे नुकसान

**वाई :** वाई महसुलच्या बेजबाबदार आणि भ्रष्ट कारभारामुळे महाराष्ट्र व केंद्र शासनाला लाखोंचा फटका बसताना दिसत आहे. मौजे कुसगांव येथील ब्लॅक जेम स्टोन क्रशर प्रकरण न्याय प्रविष्ट असताना आता त्याठिकाणी महसुलच्या आशीर्वादाने नवीन बातमी समोर आली आहे. सदर ठिकाणी ब्लास्टिंग करून साठा करण्यात येत असणारे क्षेत्र संबंधित मालकाचे नसून त्याठिकाणी वाहत असणारा नैसर्गिक ओढा आहे हे पुराव्यानिशी सिध्द झाले आहे. केंद्र शासनाच्या अटल भूजल योजने अंतर्गत तयार करण्यात आलेल्या यादीत कुसगाव सुध्दा येते. या योजने अंतर्गत गावातील प्रमुख व मोठ्या प्रमाणत पाणी व बंधारे असणाऱ्या ओढ्यांमध्ये शासन सर्वे करून पाणी जमिनीत मुरवण्यासाठी बोअरवेल तयार करते. ज्याला शासकीय शब्दात रिचार्ज शाफ्ट असे बोलले जाते. या बोअरवेल (रिचार्ज शाफ्ट) च्या मध्येमातून जमिनीतील पाणीपातळी वाढवण्यासाठी उभारणी केली जाते ज्यासाठी शासन लाखो रुपये खर्च करत आहे. अश्या बोअरवेल (रिचार्ज शाफ्ट) शेजारी ब्लास्टिंग केले जात आहे व ब्लास्टिंग झाल्यानंतर जो माल (डबर व क्रश सांड) तयार केला जातोय तो राजरोसपणे या बोअरवेल (रिचार्ज शाफ्ट) वर टाकला जातोय व नैसर्गिक ओढ्याचे पात्र बदलून या ओढ्याचा रस्ता म्हणून वापर हा राजरोसपणे वाईच्या महसूल प्रशासनाच्या मेहरबानीने सुरू आहे. डबर क्रश सांड बरोबरच डोंगरातील मुरूम काढून संबंधित ओढा मूजवून त्याचे पात्र बदलण्याचे सुध्दा काम याठिकाणी सुरू आहे.

एका बाजूला शासनाला महसूल देणारे हे विभाग शासनाच्या पैशांचे वाटोळे होताना आपले डोळे बंद करून गप्प पडून बघ्याच्या भूमिकेत काम करत आहे. या ठिकाणी आज पर्यंत वाईच्या महसूल विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही त्यामुळे भविष्यात या परिसरात कोणतीही जिवित हानी झाल्यास त्यास सर्वस्वी महसूल प्रशासन जबाबदार राहील.

एका बाजूला सर्वसामान्य वाईकरांच्या दारात जर गौण खनिजचा छोटासा जरी साठा दिसला तर त्यांना लाखो रुपयांचा दंड ठोकून त्यांच्या सातबारावर बोजा चढवणारे हे महसूल विभाग अशा धन धांडग्यांना मात्र अभय देताना दिसत आहेत त्यामुळे या विभागातील अश्या पदाधिकाऱ्यांमुळे संपूर्ण महसूल विभाग बदनाम झाले आहे. साताऱ्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी या तहसीलदार, मंडल अधिकारी व तलाठी या त्रिमुर्ती अधिकाऱ्यांना पाठीशी घालणार की यांच्यावर कारवाई करणार हे येणाऱ्या काळात बघण्यासारखे राहणार आहे.

# कराड शहर परिसरात पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन

## रेकॉर्डवरील ५ संशयितांवर प्रतिबंधात्मक कारवाई ; विविध प्रकारच्या १३१ कारवाया

**कराड :** कराड शहर व परिसरात वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन कराडचे पोलीस उपाधीक्षक अमोल ठाकूर तसेच शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक के एन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिसांनी सकाळी साडेअकरा ते दुपारी तीन वाजेपर्यंत कोंम्बिंग ऑपरेशन राबवून पाच रेकॉर्डवरील संशयितांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली.

यामध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये ९१ कारवाया, मोटार वाहन कायद्यान्वये ४० कारवाया, तर ५ रेकॉर्डवरील संशयितांवर पोलिसांकडून प्रतिबंधक कारवाई करण्यात आली.

या कोंम्बिंग ऑपरेशन मोहिमेत पोलीस उपाधीक्षक अमोल ठाकूर, कराड शहर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक के. एन. पाटील यांच्यासह कराड शहर पोलीस ठाणे, कराड शहर वाहतुक शाखा व कराड उपविभागीय कार्यालय यांच्याकडील ८ पोलीस अधिकारी व ३० पोलीस कर्मचाऱ्यांनी भाग घेतला.

या मोहिमेअंतर्गत कराड शहर, विद्यानगर , कॉलेज परिसर तसेच ओगलेवाडी, हजारमाची शाळा, कॅफे परीसरामध्ये कोंम्बिंग ऑपरेशन व नाकाबंदी ऑपरेशन करीत महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये सनी उर्फ गणेश सुरेश शिंदे रा. ओगलेवाडी, ता. कराड यांचेवर पोलिसांनी कारवाई केली. विद्यानगर, कॉलेज परिसर तसेच ओगलेवाडी, हजारमाची शाळा, कॅफे परिसरात ९० कारवाया, मोटार वाहन कायद्यान्वये ४० कारवाया करून २२ हजार ५०० रूपये दंड वसूल करण्यात आला. रेकॉर्डवरील ५ संशयितांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली.

सार्वजनिक वाहतुकीस अडथळा करणा-या वाहनांवर कारवाया करण्यात आल्या. तसेच कराड शहर, विद्यानगर कॉलेज परिसर तसेच ओगलेवाडी, हजारमाची शाळा, कॅफे परीसरामधील गुन्हेगारी मोडुन काढणेचा प्रयत्न करण्यात आला. यादरम्यान कराड पोलीसांचे रेकॉर्डवरील १० माहीतगार गुन्हेगारांना चेक करण्यात आले. त्यांच्या गुन्हेगारी हालचाली पडताळण्यात आल्या. रेकॉर्डवरील संशयित शेखर प्रकाश सुर्यवंशी, संग्राम प्रल्हाद पवार, सनी ऊर्फ गणेश सुनील शिंदे, जमीर मलीक फकीर शेख, गणेश पप्पु जावीर, अमित हणमंत कदम, राजु गेणु चव्हाण, शितल गोरख काळे, अनिकेत सुनिल खरात, अखिलेश सुरज नलवडे यांना अचानकपणे चेक करुन त्यांच्या गुन्हेगारी हालचाली पडताळण्यात आल्या. तडीपार गुन्हेगारांना चेक करण्यात आले.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली उपाधीक्षक अमोल ठाकुर , वरिष्ठ पोलीस निरीक्षक के. एन. पाटील, कराड उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे निर्भया व पोलीस अंमलदार कराड शहर पोलीस ठाणेचे सपोनि प्रशांत बधे, गणेश कड, पोउनि. धनाजी देवकर, कृष्णा डिसले, मारुती चव्हाण, राज पवार, भोसले व कराड वाहतुक शाखेचे सपोनि संदिप सुर्यवंशी, पोउनि. विजय भोईटे यांच्यासह अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी केली.

# पिंपोडे बुद्रुक, सोनके आणि तडवळे गावच्या मंदिरातील पितळी घंटा,मुकुट चोरीला

**कोरेगाव :** पिंपोडे बुद्रुक, तडवळे आणि सोनके या तीन गावच्या मंदिरातील सुमारे ५६ हजार रुपये किंमतीच्या पितळी घंटा व देवीच्या मुकुटावर चोरट्यांनी डल्ला मारला आहे. चोरट्यांच्या रडारवर मंदिरातील मौल्यवान व पितळी साहित्य व वस्तूवर लक्ष्य केंद्रित केल्याचे दिसत आहे. सोळशी व नायगांव या दोन गावांत चोरी झाली होती.मंदिरातील साहित्य चोरीचे सत्र सुरूच असून,गेल्या चार दिवसातील ही दुसरी घटना आहे.

यांबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवार दि.२४ रोजी मध्यरात्री पिंपोडे बुद्रुक येथील पुजारी सकाळी श्रीराम मंदिरात आले असता मंदिरातील दोन्ही घंटा चोरीस गेल्याचे उघड झाले, मंदिरातील बावीस हजार रुपये किमतीच्या दोन पितळी घंटा तसेच तडवळे येथील गणेश मंदिरातील पंधरा हजार रुपये किमतीची पितळी घंटा आणि आठ हजार किमतीचा पितळी उंदीर चोरीस गेला.सोनके येथील मरीआई आणि लक्ष्मीआई दोन्ही मंदिरातील अकरा हजार किमतीचा पितळी मुकुट आणि समई इत्यादी शुक्रवारी रात्री चोरी झाल्याची घटना घडली याबाबत अज्ञात चोरट्याविरुद्ध वाठार पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.या घटनेची तक्रार बाळकृष्ण तांबोळी यांनी वाठार स्टेशन पोलीस ठाण्यात दिली आहे. याबाबतचा पुढील तपास सपोनि अविनाश माने यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि भोसले करीत आहेत.

# मायणीत ज्वेलरी फोडण्याचा प्रयत्न अयशस्वी

**मायणी :** मायणी व मायणी परिसरात अनेक ठिकाणी चोरी व चोरीचे प्रयत्न होत असल्याचे चित्र सध्या सगळीकडे पाहावयास मिळत आहे त्यातच काल रात्री मायणी येथील मुख्य रस्त्यावर असणाऱ्या ज्वेलरी दुकानात दुकानदाराच्या अतिदक्षतेमुळे येथील ज्वेलरी फोडण्याचा चोरट्यांचा प्रयत्न अयशस्वी झाला.

या संदर्भात स्थानिक सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी मायणी ता. खटाव येथे मल्हारपेठ -पंढरपूर या मुख्य रस्त्यावर प्राथमिक शाळेच्या पुढे डी.आर. ज्वेलर्स नावाचे ज्वेलरीचे दुकान आहे. शुक्रवारी पहाटे दोन ते तीनच्या दरम्यान सदर घटना घडल्याचे सीसीटीव्ही फुटेज वरून समजले. ज्वेलरीच्या दुकानबाहेर लोखंडी सरकता दरवाजा चोरट्यांनी कटावणीने तोडून त्याच्या आत असलेले पत्र्याचे शटर देखील उचकटून दोन चोररट्यां पैकी एकाने दुकानात प्रवेश केला तर दुसरा दुकाना बाहेर थांबला होता. आत आलेल्या चोरट्याने . तोंडावर बुरखा घातला होता. तत्पूर्वी चोरट्यांनी दुकानाच्या बाहेर असलेले सीसीटीव्ही काढून दुकानापुरी लाईटचा बल्ब काढून टाकला होता.

# आर्वी येथे चाकूने भोसकल्याने एक जण गंभीर जखमी

**कोरेगांव :** मौजे आर्वी ता कोरेगाव गावचे हद्दीत सिध्दनाथ जाधव यांचे घरासमोरील ओसरीवर बसलेल्या ८७ वर्षीय वृद्धावर जीवे मारण्याच्या उद्देशाने चाकुने वार केल्याने गंभीर जखमी. भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या फिर्यादीही जखमी जखमी झाल्या. गंभीर जखमी वृद्धास तात्काळ सातारा येथील खाजगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. याप्रकरणी सौ. लिलावती शिवाजी जाधव. वय ६० वर्षे, यांनी रहिमतपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

रहिमतपूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे व पोलीस जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत व सुव्यवस्था चोख ठेवल्याने पुढील वादावादी तून होणारा अनर्थ टळला.

याप्रकरणी रहिमतपूर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास फिर्यादिचे दीर तानाजी परशुराम जाधव वय ८७ वर्षे, हे त्यांचे चुलत भाउ सिध्दनाथ जाधव यांचे घरासमोरील ओसरीवर बसलेले असताना संशयित आरोपी जगन्नाथ मारुती जाधव वय ७० वर्षे, रा. आर्वी यांनी त्यांचेकडील चाकुने छाती व पोटावर वार करुन त्यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

त्यावेळी फिर्यादी सौ लीलावती जाधव यांनी त्यांचे भांडण सोडवण्याकरीता गेल्या असता चाकुचे वार फिर्यादिच्या ही डाव्या हाताचे दंडावर व अंगठ्याशेजारील बोटावर झाल्याने त्यांना ही गंभीर दुखापत झालेली आहे. याप्रकरणी रहिमतपूर पोलिसांनी संशयित आरोपी जगन्नाथ मारुती जाधव वय ७० वर्षे, रा. आर्वी ता. कोरेगांव यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे करीत आहेत.

# दबावाचे राजकारण कराल तर जश्यास तसे उत्तर देण्यात येईल : विजयसिंह पिसाळ

**बावधन :** सध्या महाराष्ट्रात निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत आणि त्यातच स्वताच्या स्वार्थापोटी काही नेतेमंडळी आपली निष्ठा,तत्वे,मूल्य यांना तिलंजाली देऊन पक्षांतर आणि फोडाफोडीचे राजकारण करण्यात व्यस्त आहेत.



परंतू या सर्वाला छेद देत वाई तालुक्यातील दरेवाडी या गावाने आपण ज्या पक्षाच्या चेहऱ्यावर निवडून आलो आहोत त्याच पक्षासोबत राहण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

वाई तालुक्यातील दरेवाडी या गावाने शरदचंद्र पवार राष्ट्रवादी या पक्षासोबतच कायम राहण्याचा निर्णय जाहीर केला.

तसे म्हणले तर दरेवाडी हे गाव बावधनच्या बारा वाड्यांपैकी एक गाव.या गावाने नेहमीच शरद पवार साहेब,मदनरावजी पिसाळ आप्पा यांच्या विचारांना साथ दिली आहे. स्व.आप्पांनी सुद्धा १९९९ साली निष्ठेला महत्व देत मंत्रीपदाची आफर धुडकावून लावत शरद पवार साहेंबासोबतच राहण्याचा निर्णय घेतला.

हीच विचाराची पंरपरा कायम ठेवत दरेवाडी या गावाने आत्ताच्या गलिच्छ राजकारणात आदरणीय पवार साहेबांसोबतच राहण्याचा निर्णय जाहीर केला आणि वाई तालुक्यात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला समर्थन देणारी पहिली ग्रामपंचायत म्हणून मान मिळवला. आणि त्यानंतर या गावातील सरपंच उपसरंपच यांना तालुक्यातील काही नेत्यांनी आणि आसपासच्या गावातील जनाधार नसलेल्या स्वयंघोषीत गावपुढाऱ्यांनी निर्णय मागे घेण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली आहे.

परंतू या सर्व घडामोंडीवर बोलताना विजयसिंह पिसाळ म्हणाले मी पक्षाचा जिल्हा अध्यक्ष या नात्याने सर्वांना सांगू इच्छितो की राजकारणात आणि समाजकारणात सर्वांना लोकशाही मार्गाने विचार माडण्याचे मुभा असते.आणि जर कोणी आमच्या कार्यकर्त्यांना अगर आमच्या सहकार्यानां दबाव टाकून त्रास देण्याचा प्रयत्न करत असेल तर आम्ही सुद्धा जश्यास तसे उत्तर देण्यास सक्षम आहोत.

# पाटण शहरात उत्स्फूर्त बंदसह भर पावसात निषेध मोर्चा

## नराधमांना फाशी व राज्यकर्त्यांनी राजीनामा द्यावा : सत्यजितसिंह पाटणकर

**पाटण :** बदलापूर येथे झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ पाटण येथे व्यापारी, व्यवसायिकांनी शनिवारी दिवसभर उत्स्फूर्त बंद पाळला. तसेच भर पावसात सकाळी ११ वाजता महिला, तरुणी नागरिकांनी हजारोंच्या संख्येने सहभाग दाखवत सदर घटनेच्या निषेधार्थ शहरातून मुक मोर्चा काढला. हा मोर्चा पाटण तहसील कार्यालय येथे आल्यानंतर दोषी नराधमांना फाशी द्या व मुग गिळून गप्प बसणाऱ्या राज्यकर्त्यांनी राजीनामे द्यावेत, अशा मागणीचे निवेदन तहसिलदार यांच्याकडे देण्यात आले.

यावेळी बोलताना सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले, बदलापूर येथील अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचारासह राज्यात महिला तरुणी व अल्पवयीन मुलींवर वाढलेल्या अत्याचार व अन्याया विरोधात शासनाने तातडीने कठोर भूमिका घेत संबंधितांना फाशी व कठोर कारवाया कराव्यात. राज्यातील महिलांवरील अत्याचाराचे हे लोन पाटण तालुक्यातील तारळेपर्यंत पोहोचले आहे. गुन्हेगार प्रवृत्तींच्या कार्यकर्त्यांना प्रशासनावर दबाव टाकून मोकाट सोडले जाते, अशा घटनांचा आम्ही तीव्र निषेध करत असून संबंधित राज्यकर्त्यांनी नैतिकतेची चाड बाळगत राजीनामे द्यावेत.

ते म्हणाले, बदलापूर येथे अल्पवयीन मुलींवर स्थानिक शाळेच्या कर्मचाऱ्याने अतिशय घृणास्पद अत्याचार केला. यासह मागील काही वर्षात राज्यात महिलांवर वाढलेले अत्याचार, अन्याय यासह तरुणी, अल्पवयीन मुलींवर होत असलेले क्रूर अत्याचार या विरोधात समाजामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. अशा नराधमांना फाशीची शिक्षा तर झालीच पाहिजे. याशिवाय संबधितांवर कठोरात कठोर कडक कारवायाही झाल्या पाहिजेत. दुर्दैवाने ज्यांच्या हाती राज्याची सत्ता आहे, असे राज्यकर्ते या अपप्रवृत्तींच्या विरोधात आवाज उठवण्याऐवजी ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांचाच आवाज बंद करण्याचा प्रयत्न करत आहेत. मध्यंतरी पाटण तालुक्यातील तारळे येथेही एका महिलेवर स्थानिक राजकीय पदाधिकाऱ्यांनी अन्याय, अत्याचार केला. संबंधित महिलेने पोलिसांकडे दाद मागण्याचा प्रयत्न केला, मात्र तेथेही राजकीय दबाव टाकून कार्यकर्ते, गुन्हेगारांना सोयीस्कररित्या यातून बाहेर काढण्यात आले. त्यामुळे देशात, राज्यातच नव्हे तर आता हेच विकृतीचे लोण थेट पाटण विधानसभा मतदारसंघातील महिला, तरुणींपर्यंत पोहोचले आहे. राजकीय सत्तेचा वापर आपल्याच माय माऊलींच्या विरोधात करणाऱ्या अशा अपप्रवृत्तींविरोधात आता सगळ्यांनी एकत्रितपणे येऊन लढण्याचा निश्चय केला आहे. एका बाजूला यातील दोषी नराधमांना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजेच, याशिवाय या दुर्दैवी घटनांना जबाबदार व गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या विद्यमान राज्यकर्ते मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांनी नैतिकतेची चाड बाळगून आपला राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.




यावेळी शिवसेना उबाठा पक्षाचे तालुकाप्रमुख सुरेश पाटील, मनसेचे तालुका प्रमुख गोरख नारकर, संजय इंगवले, सौ. विद्या म्हासुर्णेकर, सौ. मीनाज मोकाशी, सौ. सोनल फुटाणे, सौ. गायकवाड, सौ. डावखरे, सौ. हादवे आदी मान्यवर पदाधिकारी, महिला, विद्यार्थिनी आदींनी निषेधात्मक विचार व्यक्त केले.